# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/आयुक्त/ 43 /2023-24
आयुक्त यांचे कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दि. 03/08/2023

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## // परिपत्रक //

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सर्व विभागामार्फत निविदा मागवुन विकास कामे व खरेदीची कामे केली जातात. निविदा मागविण्याच्या तारखेपासुन निविदा किती दिवसात अंतिम करावी याबाबत शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग तसेच उद्योग, उर्जा व कामगार विभागाने कालमर्यादा घालुन दिलेली आहे. तसेच जी कामे प्रतिवर्षी करण्यात येतात त्याबाबत निविदेची कार्यवाही कधी सुरू करावी याबाबतही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केलेली आहे. परंतु काही विभागांच्या काही निविदांबाबत या कालमर्यादांचे पालन होत नसल्याने कामे सुरु होण्यास विलंब होत आहे. तसेच जुन्या कामाच्या निविदेची मुदत संपण्यापुर्वी नवीन वर्षाच्या कामाची निविदा प्रसिध्द करुन नवीन ठेकेदाराला कार्यादेश देण्यास विलंब होत असल्याने दैंनदीन काम थांबविता येत नसल्याने जुन्याच ठेकेदाराला वारंवार मुदतवाढ देणे भाग पडत आहे. यामुळे निविदा प्रक्रीयेच्या कालमर्यादेबाबत व जुन्या निविदेची मुदत संपण्यापुर्वी Advance निविदा प्रक्रीया सुरु करण्याबाबत सर्व विभागानी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1) आयुक्तांची प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर वेळ न दवडता त्वरीत निविदा प्रक्रीया सुरु करावी.
2) निविदा प्राप्त झाल्यानंतर शासनाच्या विविध विभागाच्या निर्देशाप्रमाणे कालमर्यादेत निविदा अंतिम करुन कार्यादेश देण्याची कार्यवाही करावी
3) निविदा उघडल्यानंतर तांत्रिक लिफाफ्याची योग्य छाननी करुन तात्काळ प्रस्ताव निविदा समितीकडे सादर करावा व निविदा समितीची कार्यवाही झाल्यातर वित्तीय लिफाफा उघडुन निविदा समितीची शिफारस घेऊन सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन कार्यादेश द्यावा.
4) निविदांच्या छाननी मध्ये किंवा इतर कोणत्याही टप्प्यावर विभागाला निर्णय घेता येत नसेल तर असा विषय तात्काळ निविदा समितीपुढे आणावा व त्यावर निर्णय घ्यावा.

5) काही कारणास्तव निविदांवर निर्णय घेता येत नसेल तर उगीचच विलंब न लावता शासनाच्या विविध निर्णयानुसार निविदेतील अटीशर्तीमध्ये बदल करावयाचा असल्यास तसा निर्णय घेऊन तात्काळ निविदा अंतिम कराव्यात. निर्णय न घेता उगाचच निविदा नस्ती विभागस्तरावर प्रलंबित ठेवू नये. अशाप्रकारे विलंबास संबंधित विभागाचा विभागप्रमुख जबाबदार असेल.

6) जुन्या वर्षाच्या निविदेची मुदत संपण्यापुर्वी तीन महिने अगोदरच नवीन वर्षाच्या निविदेची प्रक्रिया सुरु करावी. त्यामुळे जुन्या निविदेला मुदतवाढ देण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. जुन्या निविदेला वारंवार मुदतवाढ देणे टाळावे. यासाठी विभागांनी विभागस्तरावर दक्षता घेण्यात यावी.

वरीलप्रमाणे सर्व विभागप्रमुख/ उपायुक्त यांनी काटेकोरपणे कार्यवाही करावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति

1. अति. आयुक्त (सर्व)
2. उपायुक्त (सर्व)
3. शहर अभियंता
4. मुख्य लेखापरीक्षक
5. मुख्य लेखा व वित्त अधिकारी
6. सहा. संचालक नगररचना
7. सर्व विभाग प्रमुख/ खाते प्रमुख